सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १२७ (२) (क), १४१(१), ४५४ व ४५७(७) (१७) अन्वये कुत्र्यावरील कराच्या नियमाचा मसुदा –

१. **संक्षिप्त संज्ञा** – या नियमांना सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे कुत्र्यावरील कराचे नियम २०२४ असे संबोधले जाईल

२. **व्याख्या** – या नियमातील संदर्भास बाधा येत नसेल तर –

१) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ असे समजावे

२) "कुत्रा" या संज्ञेमध्ये तीन महिने अगर अधिक वयाचा कुत्रा व कुत्री पिलांचा समावेश होतो

३) "नमुना" म्हणजे या नियामासोबत जोडलेला नमुना

४) "कलम" म्हणजे "अ" मध्ये नमूद कायद्याचे कलम

५) "कर"म्हणजे "अ" मध्ये नमूद अधिनियमाचे कलम १२७(२) (क) अनुसार कुत्र्यावर आकारला जाणारा कर

६) "वर्ष"म्हणजे एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिवसापासून सुरु होणारे वर्ष

७) "प्राधिकृत अधिकारी" म्हणजे उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार मा.महापालिका आयुक्त यांनी सदर कामकाजासाठी अधिकार प्रदान केलेला मनपा अधिकारी.

८) या नियमामध्ये योजलेले शब्द अगर अर्थ याची व्याख्या दिली नसेल तर अनुक्रमे कायद्यामध्ये जो अर्थ दिला असेल तोच राहील

३. **कर भरण्यास पात्र व्यक्ती** – उपविधी नियम क्र.१२ चे अधीन राहून जो इसम सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या हद्दीत कुत्रा बाळगेल असा इसम सदर कर भरण्यास पात्र असेल.

४. **कराचा दर** – हा कर प्रत्येक कुत्रामागे परिशिष्ट "अ" प्रमाणे आकारण्यात येईल

५. **कर आगावू भरणे** – हा कर संपूर्ण वर्षाकरीता त्या वर्षाच्या एप्रिल महिन्यामध्ये आगावू भरण्याचा आहे.

६. **परवाना प्राप्त करण्याची पद्धत** –

अ) सां.मि.कु.महानगरपालिकेच्या हद्दीत कोणत्याही वर्षात ज्या व्यक्तीचा कुत्रा पाळण्याचा इरादा आहे अशी व्यक्ती त्या वर्षातील एप्रिल महिना संपण्यापूर्वी मा.महापालिका आयुक्त यांचेकडे नमुना "अ" मध्ये कुत्रा पाळण्यासंबंधी अर्ज ऑन लाईन किंवा ऑफ लाईन पद्धतीने करून परवानगी घेईल मात्र एप्रिल महिन्याच्या अखेरीनंतर कोणत्याही वेळी एखाद्या व्यक्तीने कुत्रा बाळगण्याची इच्छा दर्शवली तर त्याने तो कुत्रा आपल्या ताब्यात आलेपासून सात दिवसाचे आत असा अर्ज दिला पाहिजे.

आ) अशा अर्जासोबत सदर परवान्याची रक्कम परिशिष्ट "अ" (१) मध्ये दर्शविल्याप्रमाणे पुर्णपणे भरली पाहीजे.

इ) असा अर्ज आल्यानंतर मा.महापालिका आयुक्त नमुना "ब" मध्ये परवानगी देतील कुत्रा कराच्या रक्कमेबरोबरच कुत्र्याला अनुक्रम नंबरचा बिल्ला परिशिष्ट "ब" मध्ये नमुद केल्याप्रमाणे बिल्ला देण्यासाठी मा. आयुक्त यांनी ठरवलेली रक्कम परिशिष्ट अ (२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे भरली पाहीजे.

७. **कुत्र्याचा मृत्यू अगर तो नाहीसा होणे वैगेरे बाबी कळविणे** - ज्या कुत्र्याचा कर भरणे पात्र आहे असा कुत्रा हरवला किंवा तो दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित केला असेल किंवा त्याचे स्थलांतर झाले असेल अथवा तो मृत्यू पावला तर कर भरण्यास पात्र व्यक्तीने तसे लेखी मनपाकडे कळविले पाहिजे. अशी माहिती आल्यानंतर त्या कुत्र्यावरील कराची रक्कम पुढील वर्षाचे सुरुवातीपासून भरण्याची त्याची जबाबदारी कमी होईल, अशी माहिती न दिलेस अशी व्यक्ती कराची रक्कम भरणेस जबाबदार राहील.

८. **काही बाबतीत पुढील कर भरणेची जरुरी नाही –**

१) एखाद्या वर्षात कुत्र्याच्या मालकीमध्ये बदल झाला असेल व त्या वर्षाची रक्कम आगाउ भरणेत आली असेल तर त्या वर्षात पुन्हा कर भरण्याची जरुरी नाही मात्र ज्या व्यक्तीच्या ताब्यात असा कुत्रा आला असेल त्या व्यक्तीने आपले नाव दाखल करून घेणेपूर्वी दिलेला परवाना आयुक्त यांचेकडे हजर केला पाहिजे.

२) ज्या आर्थिक वर्षाकरीता कुत्रा कराची रक्कम भरलेली आहे, असा कुत्रा मेल्यास कर भरणारी व्यक्ती व ज्याच्या ताब्यात तो कुत्रा होते अशा व्यक्तीस रु.१/- (अक्षरी रु. एक फक्त) भरून दुसरा कुत्रा राहिलेल्या मुदतीकरिता बाळगता येईल.

९. **बिल्ल्यांसंबंधी तरतूद –**

१) नियम क्र.६ प्रमाणे दिलेला बिल्ला संबंधित कुत्र्याच्या गळ्यामध्ये बांधला पाहिजे.

२) दिलेला बिल्ला हरवला तर नियम क्र.६(इ) मध्ये नमूद केलेले शुल्क पुन्हा भरल्यास, बिल्ल्याचा गैरवापर टाळण्यासाठी योग्य ती चौकशी करून प्राधिकृत अधिकारी यांचेकडे बिल्ला मिळू शकेल.

१०. तपासणीसाठी कुत्रा हजर ठेवणे –

ज्या व्यक्तीस कुत्रा पाळण्याची परवानगी दिली आहे, अशा व्यक्तीने जरूर लागेल त्यावेळी मा. आयुक्त अगर प्राधिकृत अधिकारी यांचेसमोर खात्री करून घेण्यासाठी व तपासण्यासाठी सदर कुत्रा हजर ठेवला पाहिजे.

११. कुत्रा पिसाळू नये म्हणून लस देणे – कुत्र्याचा मालक अथवा कुत्रा जिच्या ताब्यात आहे अशी व्यक्ती कुत्र्याला लस टोचण्याच्या प्रयोजनार्थ महापालिकेकडून निश्चित केलेले शुल्क परिशिष्ट "अ" (३) मध्ये दर्शविलेनुसार मनपाकडे जमा केलेनंतर अशी व्यवस्था मनपाकडून निश्चित करण्यात आली असेल त्या ठिकाणी लस टोचण्यासाठी कुत्रा आणील अथवा एखाद्या पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक यांचेकडून लस टोचून आणेल आणि कुत्र्याला अशाप्रकारे लस टोचण्यात आली आहे असे प्रमाणपत्र उपविधी ६(१) खालील अर्जासोबत जोडेल.

१२. कोणत्याही कारणाने कुत्रा पिसाळला असेल तर परवानाधारक याने स्वतः हून मनपा पशुवैद्यकीय विभागाला तात्काळ कळविले पाहिजे किंवा कुत्र्याला मनपा पशुवैद्यकीय विभागाकडे हजर केले पाहिजे.

१३. **माफी** – या उपविधीत अंतर्भूत असलेली कोणतीही तरतूद मनपा हद्दीत प्रवास करणाऱ्या किंवा तीस दिवसापेक्षा कमी इतक्या तात्पुरत्या कालावधीसाठी वास्तव्य करणा-या व्यक्तीच्या ताब्यात असलेल्या कुत्र्याच्या बाबतीत लागू होणार नाही.

१४. नियम क्र. १३ मधील व्यतिरिक्त, वरील नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्तीस परिशिष्ट अ (४) मध्ये दर्शविलेप्रमाणे दंड होवू शकेल.

नमुना - अ

प्रति,

मा. आयुक्त,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचेकडे

अर्जदाराचे नाव –

रहिवास संपूर्ण पत्ता -

मा. महोदय,

मी, वरील नमूद पत्त्यावर रहात असून सदर ठिकाण हे मनपा क्षेत्रात समाविष्ट असून, पुढील वर्णनाचा कुत्रा बाळगण्याची माझी इच्छा आहे.

वर्णन – कुत्रा / कुत्री

वय –

जात (ब्रीड) –

रंग –

ओळखीचे काही चिन्ह असलेस नमूद करावे –

फोटो – सोबत जोडावा.

कुत्र्यावरील करासंबंधी मनपाचे उपविधी तसेच शर्ती अटी मी वाचलेल्या असून त्यांचे मी पालन करेन. तरी सदर कुत्रा बाळगण्याची मला परवानगी मिळावी अशी विनंती आहे.

दिनांक

अर्जदाराची सही

नमुना ब

श्री/ श्रीमती ---------- यास, आपण केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका (कुत्र्यावरील कर) उपविधी २०२४ अन्वये पुरविण्यात आलेला बिल्ला कुत्र्याच्या गळ्यातील पट्टयात नेहमी अडकवून ठेवण्यात येईल आणि अधिनियमातील व उप विधीतील सर्व शर्ती अटींचे यथोचितरित्या पालन करण्यात येईल, या शर्तीस अधीन राहून सन २० पासून प्रारंभ होणा-या वर्षाच्या मुदतीत खाली देण्यात आलेल्या वर्णनाचा कुत्रा,मनपा हद्दीत बाळगण्यासाठी याद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

वर्णन – कुत्रा / कुत्री

वय –

जात (ब्रीड) –

रंग –

ओळखीचे काही चिन्ह असलेस नमूद करावे –

श्री/ श्रीमती ---------- यास,याद्वारे असा आदेश देण्यात येतो कि आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका याजकडून अथवा प्राधिकृत अधिकारी याजकडून उक्त वर्षाच्या मुदतीत मागणी करण्यात आल्यावर हे परवाना पत्र सादर करण्यात यावे.

दिनांक - सील

प्राधिकृत अधिकारी

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

परिशिष्ट "अ"

अ.क्र.	तपशिल	
१	परवाना शुल्क वार्षिक	र.रु.
	कुत्रा	
२	बिल्ला रक्कम	५००/-
	कुत्रा	
३	लस टोचणी फी (एकवेळ)	३००/-
४	दंड रक्कम रुपये	५०/-
		५००/-

परिशिष्ट "ब"

कुत्रा (श्वानासाठी) बिल्ल्याचे स्वरुप :- गोलाकार, त्याच्या एकी बाजुला मोनोग्राम (महापालिकेचा लोगो) आणि दुसऱ्या बाजूला कुत्रा (श्वानाचा) नंबर असेल.

त्यासाठी लागणारे मटेरियल :- (ब्रास) पितळ असेल

त्या बिल्ल्याचे वजन :- २० ग्राम असेल

बिल्ल्याच्या गोलाकारमधील अंतर (व्यास) :- ४ से.मी. असेल.

बिल्ल्याच्या वरच्या योग्य ठिकाणी छिद्र असेल ज्यामुळे कुत्र्याच्या गळयात अडकवता येईल.